# धर्म आणि आपण

**प्रा. सचिन जयस्वाल**
राज्यशास्त्र विभाग,
राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय जालना.
मो. न. 9604316431
sachinjaiswal2012@gmail.com

**प्रस्तावना –**

मानवी समाजाच्या निर्मितीपासून तर आजच्या एकविसाव्या शतकापर्यंत धर्माची चर्चा अखंडितपणे सुरू असल्याचे दिसून येते. धर्माकडे मानवमुक्तीचे, समाजमुक्तीचे एक साधन म्हणून बघितले जात असल्यामुळे धर्मासंबंधीची चर्चा याच दिशेने होत होती. परंतु मागील काही वर्षात या प्रकारची चर्चा होणे जवळपास बंद झाले आहे. त्याऐवजी आता आपला धर्म कसा श्रेष्ठ व दुसऱ्याचा धर्म कसा दुय्यम आहे हे अतिरंजितपणे दर्शविण्याचेच प्रयत्न सुरू झालेले आहे. प्राचीन मशिदींच्या जागी कोणकोणते मंदिर होते, भोंग्यांच्या माध्यमातून समाजाचे स्वास्थ्य वातावरण अस्वस्थ करण्याचा प्रयत्न वर्तमानातील काळातील राज्यकर्ते, माध्यमे, धार्मिक टोळया व कडव्या मूलतत्ववादी लोकांकडून जाणूनबुजून होत असल्याचे दिसून येते. धर्माला राजकीय सत्ताप्राप्तीचे आणि इतर समुदायांवर वर्चस्व गाजवण्याचे हत्यार समजले जाऊ लागले. विसाव्या शतकाचे शेवट व एकविसाव्या शतकाची सुरुवात ही जगात जणूकाही प्रचंड सांस्कृतिक-धार्मिक संघर्ष चालू असल्याप्रमाणे युद्धमय बनलेली दिसते. त्यामुळे आज धर्मचिकित्सेची यापूर्वी कधीही नव्हती एव्हढी गरज निर्माण झाली आहे. ही चिकित्सा माणसाचा उदय, विकास, जीवनसंघर्ष व त्याच्या जगण्यातील मूलभूत समस्यांचा विचार करण्याऱ्या विविध ज्ञानशाखांच्या सहाय्याने झाली तर धर्माचे मूळ स्वरूप व उद्धिष्ट्ये त्यातून स्पष्ट होईल.

धर्माच्या नावाने जनतेत दुही माजविणे, खोट्या आततायी असंतोषाची व द्वेषाची आग भडकविणे व जनतेची शक्ति दुभंगून खच्ची करणे हे प्रयत्न सध्या सुरू आहेत. भारताची फाळणी करण्याचे दुष्ट कारस्थान इंग्रजांनी तडीला नेले ते याच धार्मिक भेदनीतीच्या आधाराने. आजही तो धोका वाढतच आहे. म्हणूनच धर्मविषयक प्रश्नांची ओळख व धोरणांची योग्य जाणीव, खंबीर अंमलबजावणी, लोकशाहीच्या संरक्षणासाठी, देशहितासाठी व प्रगतीसाठी आवश्यक आहे.

शिक्षण हे सर्व प्रकारच्या समस्यांवर जालिम उपाय आहे. परंतु शिक्षण सुद्धा तटस्थ पद्धतीने दिल्या गेले पाहिजे. कोणत्याही धर्मसंस्थेच्या आधाराने व आश्रयाने लहानपणापासून मुलांचे शिक्षण झाले तर मुले धर्मश्रद्धेने भारलेली व धर्मसंस्था ठरवतील त्या सामाजिक संकेतांना पवित्र व अपरिवर्तनीय मानणारी होतात. पुढे प्रौढ वयातही हेच संकेत लोकमानसात घर करून बसतात. त्यामुळे शिक्षण हे धर्मसंस्थेद्वारे देण्यात येऊ नये. आपले विचार, श्रद्धा, संस्कार, सामाजिक मते शिक्षणाच्या माध्यमातून लादण्याचा अधिकार कोणत्याही धर्मसंस्थांना देण्यात येऊ नये.

**संशोधनाचे उद्दीष्ट्ये –**

1. भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षता या तत्वाचे अध्ययन करणे.
2. भारतीय नागरिकांच्या धर्माच्या मूलभूत अधिकाराचे विश्लेषण करणे.
3. भारतीय लोकशाही समोरील धर्मवाद समस्येचे अध्ययन करणे व त्यावर उपाय सुचविणे.

**भारतीय राज्यघटना व धर्म –**

भारतीय नागरिकांचा मूळ ग्रंथ हा भारताचे संविधान हा आहे. भारतीय संविधानाने भारतीयांच्या गुलामगिरीच्या, दास्यत्वच्या शृंखला तोडून तमाम भारतीयांना एक स्वतंत्र्य, सार्वभौम, गणराज्य, धर्मनिरपेक्ष व समाजवादी भारत राष्ट्र अर्पण केले आहे. या सार्वभौम राष्ट्रात प्रत्येकास स्वातंत्र्य, समानता, बंधुता व न्यायाची हमी प्रत्येक नागरिकास दिलेली आहे. आपल्या राज्यघटनेच्या पायाभूत व मूलभूत तत्वांमध्ये धर्मनिरपेक्षता अत्यंत महत्वाचे तत्व आहे. परंतु दुर्दव्याने या तत्वामुळे या देशात आजपर्यंत जितके वाद निर्माण झाले आणि जितकी भांडणे झाली, तितकी इतर कुठल्याही तत्वामुळे झालेली नाहीत. 1976 साली 42 वी घटनादुरुस्ती होईपर्यंत समाजवादाप्रमाणेच ‘धर्मनिरपेक्षता’ हा शब्द सुद्धा घटनेत कोठेही नव्हता. घटनाकारांनी हे तत्व गृहीत धरूनच विविध तरतुदी केल्या होत्या. प्रत्यक्ष शब्द टाकण्याची त्यांना आवश्यकता वाटली नाही.

भारतीय राज्यघटनेप्रमाणे धर्माचा मूलभूत अधिकार दिला असला तरी धर्म ही खाजगी बाब मानली आहे. धर्मनिरपेक्षता म्हणजे निधर्मीतता किंवा धर्मातीतता किंवा धर्माविरहितता नव्हे. तर धर्मनिरपेक्षता म्हणजे धार्मिक तटस्थता किंवा कुठल्याही धर्माचा सार्वजनिक जीवनात हस्तक्षेप न करणे व कोणत्याही धार्मिक विधिना व व्यवहारांना कोणत्याही शासकीय समारंभामध्ये प्रवेश न देणं होय. परंतु वर्तमानात सर्वच राज्यकर्त्यांकडून या तत्वास सर्रासपने मूठमाती देऊन राज्यघटनेचा भंग केल्या जात आहे.

आपल्या देशाची राज्यघटना ही सयुंक्त राज्यपद्धतीची Federal Constitution आहे. केंद्रसरकार व राज्यसरकार यांच्यात संयुक्तिक अधिकार विभागणी केली आहे. आपली भौगोलिक स्थिति, लोकसंखेची विभागणी ही वेगवेगळया राज्यात वेगवेगळी आहे. त्या राज्यातील परिस्थिति, लोकसंख्या इ. घटकांवर कायदे करण्याचा अधिकार संबंधित राज्य सरकारला असतो. काही राज्यांमध्ये काही धर्मीय बहुसंख्य तर इतर धर्मीय अल्पसंख्य असतात व काही राज्यात याच्या उलट परिस्थिति असते. धार्मिक अल्पसख्यांक, भाषिक अल्पसंख्यांक इ. चे प्रमाण प्रत्येक राज्यात वेगवेगळे आहे. प्रत्येक राज्यातील अल्पसंख्यांच्या धर्माचे, भाषेचे, संस्कृतीचे संरक्षण करण्याकरिता त्या राज्यांना संविधानाने खास अधिकार पुरवलेले आहेत. उदा. ईशान्य भारतात किमान पाच राज्यांमध्ये ख्रिचन धर्मीय बहुसंख्य तर हिंदू व इतर सर्व धर्मीय अल्पसंख्यांक आहेत. काश्मीर मध्ये मुसलमान धर्मीय बहुसंख्य तर इतर अल्पसंख्यांक आहेत. महाराष्ट्रात मराठी भाषिक बहुसंख्यांक तर इतर भाषिक अल्पसंख्यांक आहेत. हीच परिस्थिति राज्यपरत्वे वेगवेगळी आहे. प्रत्येक राज्याने जर बहुसंख्यांचे हित डोळ्यासमोर ठेऊन इतरांप्रती पक्षपाती धोरण ठेऊन कायदे केले तर या देशाची अखंडता, एकता धोक्यात येईल हे लक्षात घेऊन घटनाकारांनी कलम 29, 30 मध्ये विशेष संरक्षण सर्व अल्पधार्मिक, अल्पसंस्कृतिक, अल्पावंशिक व अल्पभाषिक घटकांना दिलेले आहे. यामुळे कुठल्याही धार्मिकांची, भाषिकांची गळचेपी होऊ शकत नाही, हे भारतीय राज्यघटनेने दिलेली एक अमोल अशी देणगी आहे.

**मानवासाठी धर्म हवा, धर्मासाठी मानव नव्हे. –**

मानवासाठी धर्म हवा की नको या प्रश्नाचे नेमके उत्तर देता येणार नाही. मानवी कल्याणासाठी धर्माचा स्वीकार करणे योग्य की धर्म नाकारणे योग्य, असा पेच आहे. समाजामध्ये धर्म हवा असे म्हणणारा एक मोठा वर्ग अस्तीत्वात आहे व या वर्गातील लोक धर्माचा कमालीचा गौरव करतात. धर्मामुळेच समाजाची धारणा होते आणि म्हणूनच धर्माचे रक्षण करणे हे आपल्यापैकी प्रत्येकाचे कर्तव्य आहे असे हा वर्ग समजतो. दुसऱ्या बाजूस धर्म हा मानवी संस्कृतीमधील एक अत्यंत अनिष्ट घटक आहे म्हणून तो फेकून दिला पाहिजे असे मानणारे घटक ही समाजात दिसतात. ते धर्माचा निषेध करून धर्मामुळे मानव जातीचा विकास कुंठित झाला असल्याचे मानतात. धर्मामुळे माणूस पिढ्यानपिढ्या अज्ञानाच्या अंधकारात पिचत पडला आहे. स्वाभाविकच धर्माचा अडसर दूर केल्याखेरीज मानव जातीला मोकळेप्रमाणे आणि पूर्ण क्षमतेने फुलता येणार नाही असे या लोकांचे म्हणणे आहे.

**मूलतत्ववादाचा भारतीय लोकशाहीस धोका –**

एका व्यापक अर्थाने मूलतत्ववाद म्हणजे मूळ धर्मग्रंथात किंवा लिखित विचारसंचितात जे काही त्या त्या धर्मसंस्थापकांनी सांगून वा लिहून ठेवले आहे, तेच खरे, चिरंतन, अपरिवर्तनीय आणि प्रमाणेय असल्याचा आग्रह धरून त्यास साजेल अशा तऱ्हेने धर्मग्रंथातील विचारसंचितांचे अर्थ लावणारे आणि तोच अर्थ खरा असल्याने इतरांनी पण मान्य करावे असे सुचविणारा एक विचार प्रकार आहे. या विचार प्रणालीला बुद्धीप्रामान्यवाद वा तर्काधारित विचारप्रणाली मान्य नसते. जे आहे, जसे आहे तेच अंतिम सत्य मानून आंधळेपणाने त्याचा स्वीकार करावा एवढेच त्यात अभिप्रेत असते.

गेल्या तीन दशकाच्या काळात भारतातील उपेक्षित, दुर्बल घटकांवर मूलतत्ववाद्यांनी आपला प्रभाव पाडायला सुरुवात केली आहे. गरीबी, दारिद्र्य, शिक्षणाचा अभाव या कारणामुळे तळागाळातील जनता कोणत्याही गोष्टीचा सारासार विचार करू शकत नाही. त्यामुळेच हे लोक त्यांच्यातिल उनिवांचा फायदा घेऊन त्यांना आपल्या धार्मिक कट्टरतावादाचे शिकार बनवतात. त्यांना आर्थिक आमिष देऊन बळजबरीने धर्मपरिवर्तन करून घेतात. लोकशाहीत मतदानाचा अधिकार हे जनतेच्या हाती असलेले सर्वोच्च व पवित्र असे हत्यार आहे. पण याही अधिकारावर यांनी हल्ला केल्याचे दिसून येते. निवडणुकीत गरीब जनतेस धर्माच्या आधारावर उमेदवार देऊन राजकीय पक्ष नागरिकांना त्याच उमेदवारांना मतदान करण्याचे आमिष दाखवितात. धर्माच्या आधारावर खासदार, मंत्री, मुख्यमंत्री सुद्धा निवडले जातात. त्यामुळे धर्म निरपेक्ष भारतात राज्यकर्ते व कट्टरतावादाचे समर्थक यानी आपल्या फायद्याकरीता धर्माचे राजकीयीकरण केल्याचे दिसून येते.

**समारोप**

धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता ही मूल्ये आपल्या संविधांनाचा आत्मा आहेत. या मूल्यांच्या आधारेच आपण आपला विकास केला पाहिजे. 'विविधतेत एकता' हे आपल्या भारतीय संस्कृतीची वैशिष्ट्य आहे. भारतीय राज्यघटनेने धर्मस्वातंत्र्याचा मूलभूत असा अधिकार दिला असला तरी धर्म ही खाजगी बाब असल्याचे स्पष्ट केले आहे व त्यामुळेच प्रत्येकाने आपला धर्म हा आपल्या घरात ठेऊन सार्वजनिक जीवनात धर्मनिरपेक्षतेचे तत्व अवलंबिले पाहिजे. राज्यकर्ता वर्ग आपले अपयश झाकण्यासाठी जनतेला सतत धार्मिक कलहामध्ये व संघर्षामध्ये गुंतवून ठेवण्याचा प्रयत्न करतो. परंतु नागरिकांनी सजगपणे व जागृतपणे सत्ताधाऱ्यांचा हा डाव हाणून पडला पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ**

1. धर्म, समाज आणि राजकारण – संपादक डॉ. अशोक चौसाळकर – लोकवाङ्मय गृह
2. समकालीन भारतीय राजकारण- काँग्रेस वर्चस्व ते हिंदू जमातवाद – सुहास पळशीकर – प्रतिमा प्रकाशन पुणे.
3. राजकीय विचारप्रणाली – डॉ. शंकर चव्हाण – प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव.
4. आधुनिक राजकीय विश्लेषण – प्रा. डॉ. शुभांगी राठी – अथर्व पब्लिकेशन्स जळगाव.
5. भारतीय शासन आणि राजकारण – प्रा. बी. बी. पाटील – फडके प्रकाशन कोल्हापूर.
6. भारताचे शासन आणि राजकारण – डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे - पिंपळापुरे प्रकाशन, नागपुर.
7. भारतीय शासन आणि राजकारण – डॉ. सुधाकर जोशी – विद्या बुक्स